रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १८ • अंक ४२
www.ramprahar.com

शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## अंतरंग

सुधागड तालुक्यात तब्बल आठ तास बत्ती गुल/२
गणेशोत्सव : महाराष्ट्र राज्य महोत्सव/४
लग्नाचे आमिष दाखवून महिलेची फसवणूक/६

## दीड दिवसाच्या गणेशाला भावपूर्ण निरोप

**अलिबाग :** दीड दिवसाचा पाहुणा असलेल्या गणपतींना गुरुवारी (दि. २८) निरोप देण्यात आला.



जिल्ह्यात १२ सार्वजनिक तर २५ हजार ५३९ खासगी इतक्या दीड दिवसांच्या गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणरायांचे बुधवारी रायगड जिल्ह्यात मोठ्या जल्लोषात आगमन झाले. सकाळच्या सुमारास अधूनमधून पावसाच्या हलक्या सरींचे विघ्न येत होते मात्र गणेश भक्तांचा उत्साह तसूभरही कमी झाला नव्हता. जिल्ह्यात एक लाख दोन हजार १९८ घरगुती तर २८६ सार्वजनिक गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. गणेशोत्सवासाठी मुंबईकर गणेशभक्त गावागावात मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. त्यामुळे एरव्ही शांत असलेल्या गावांना जाग आली असून गावागावांमध्ये वर्दळ पाहायला मिळत आहे.

# राज्यात ‘श्रीगणेशा आरोग्याचा’

## विशेष मोहिमेंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे

**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ या विशेष मोहिमेंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.



या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे.

शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्यावतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, स्थानिक वैद्यकीय महाविद्यालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांची संपूर्ण टीम सक्रिय सहभागी झाले आहेत.

गणेशोत्सव सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना आहे. ‘श्री गणेशा आरोग्याचा’ या उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळत आहे. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार आहेत. हा उपक्रम म्हणजे आरोग्यसेवेतील लोकाभिमुख आणि जनहिताचा उत्तम आदर्श ठरत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

### गणेश मंडळांकडून व्यापक जनजागृती

नागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळावी यासाठी मागील आठवडाभर गणेश मंडळांकडून बॅनर, पत्रकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू आहे. परिणामी या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि भाविक पुढे येत आहेत. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे.

## विरार इमारत दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू

**विरार : प्रतिनिधी**



विरार पूर्व येथील चामुंडानगरमधील रमाबाई अपार्टमेंट कोसळली. या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला आणि नऊ जण जखमी झाले. सर्व मृतांची ओळख पटविण्यात आली आहे. जखमींवर उपचार सुरू आहेत. वसई-विरार महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार इमारत दुर्घटनेत ज्यांचा मृत्यू झाला त्यात एक वर्षाच्या चिमुरडीचाही समावेश आहे. मृतांमध्ये उत्कर्षा जोवील या एक वर्षाच्या चिमुरडीचा तसेच ११ वर्षांच्या अर्णव निवळकर याचाही समावेश आहे.

वसई – विरार महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार इमारतीच्या ढिगाऱ्याखाली एकूण २६ जण दबले होते. यापैकी १७ जणांचा मृत्यू झाला आणि नऊ जण जखमी झाले. जखमींपैकी दोघांना उपचार करून घरी पाठवले आहे आणि इतर सात जणांवर उपचार सुरू आहेत. सर्व मृतांची ओळख पटली आहे. मुख्यमंत्र्यांनी नियमानुसार इमारत दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**मृतांची नावे**


आरोही जोवील (२४), उत्कर्षा जोवील (१), लक्ष्मण सिंग (२६), दिनेश सकपाळ (४३), सुप्रिया निवळकर (३८), अर्णव निवळकर (११), पार्वती सकपाळ (६०), दिपेश सोनी (४१), सचिन नेवाळकर (४०), हरिश बिष्ट (३४), सोनाली तेजाम (४१), दिपक बोहरा (२५), कशीश सहेनी (३५), शुभांगी सहेनी (४०), गोविंद रावत (२८), ओंकार जोवील (२६), रोहिणी चव्हाण (३५).



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गव्हाण जि.प.गट व उलवे नोड परिसरातील रहिवाशांना मोफत गणपतीचा शिधा वाटप करण्यात आला. या सोहळ्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे तिथीनुसार अभीष्टचिंतन करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रा. डॉ. सदाशिवराव कदम, लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, विजय घरत, रूपेश धुमाळ, निलेश खारकर, सचिन घरत, धीरज ओवळेकर आदी उपस्थित होते.

## भरधाव ट्रकच्या धडकेत सहा जण ठार

**चंद्रपूर : प्रतिनिधी**



राजुरा तालुक्यातील कापणगाव येथे ट्रकने रिक्षाला जोरदार धडक दिल्याने रिक्षामधील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

प्रकाश मेश्राम (ऑटो चालक, ४८/पाचगाव), रवींद्र बोबडे (४८/पाचगाव), शंकर पिपरे (५०/कोची), तनु पिंपळकर (१६/पाचगाव), ताराबाई पप्पूलवार (५०/पाचगाव) आणि वर्षा मांदाडे (५०/खामोना) अशी मृतांची नावे आहेत. तर गंभीर जखमी असलेल्या तीन जणांना चंद्रपूर येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आलं आहे. एक प्रवासी किरकोळ जखमी असून त्याच्यावर राजुरा येथे उपचार सुरू आहेत.

ट्रक हा राजुऱ्याकडून खामोना-पाचगाव येथे जात होता, तर रिक्षा गडचांदूर येथून राजुऱ्याकडे येत होती. कापणगाव येथे सर्विस रोड वरून हायवे वर रिक्षा येताच विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकने रिक्षाला जोरदार धडक दिली. यामध्ये रिक्षा चालक प्रकाश मेश्राम याच्यासह तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. याचवेळी इथून जात असलेले राजुर मतदारसंघाचे आमदार देवराव भोंगळे यांनी तातडीने अपघातग्रस्तांना मदत दिली.

## निवडक

### लोकप्रिय ज्येष्ठ अभिनेते बाळ कर्वे यांचे निधन

**मुंबई :** अनेक नाटके आणि मालिकांमधून आपल्या अभिनयाची छाप सोडणारे अभिनेते बाळ कर्वे यांचे निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते. दूरदर्शनवरील चिंतामणी विनायक जोशी यांच्या पुस्तकांवर आधारित ’चिमणराव गुंड्याभाऊ’ या विनोदी टेलिव्हिजन सिटकॉममध्ये चिमणराव म्हणून दिलीप प्रभावळकर यांच्यासोबत गुंड्याभाऊंच्या भूमिकेत ते सर्वाधिक लोकप्रिय झाले होते.

### अरुण गवळीला दिलासा, १८ वर्षांनी जामीन मंजूर

**मुंबई :** मुंबईतील शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा झालेल्या अरुण गवळीला सुप्रीम कोर्टाने गुरुवारी जामीन मंजूर केला. कोर्टाकडून दिलासा मिळाल्याने तब्बल १८ वर्षानंतर गवळीची जामिनावर सुटका होणार आहे. गुरुवारी सुप्रीम कोर्टात गवळींच्या याचिकेवर सुनावणी झाली.

## आंदोलन लोकशाहीच्या चौकटीबाहेर जाऊ नये -मुख्यमंत्री फडणवीस

### मनोज जरांगेंच्या आंदोलनावर स्पष्ट भूमिका

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे मिळावे यासह इतर मागण्यांसाठी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील हे मुंबईच्या दिशेने निघाले. या वेळी या आंदोलनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकशाहीच्या चौकटीत त्याच्यावर काय जे उपाय करता येतील ते करू. पण माझी एवढीच अपेक्षा आहे की कुठलेही आंदोलन लोकशाहीच्या चौकटी बाहेर जाऊ नये, अशी स्पष्ट प्रतिक्रिया दिली आहे.



ते म्हणाले की, शासन दोन्ही समाजाच्या हिताचा विचार करेल. कुठल्याही समाजाला दुसऱ्या समाजाच्या समोर आणण्याचा शासनाचा हेतू नाही. त्यामुळे कोणावर अन्याय करुन दुसऱ्याला काही देण्याचा प्रश्न नाहीये. दोघांचेही प्रश्न आम्ही सोडवणार आहोत. त्यामुळे ओबीसी समजाने तुमच्यावर अन्याय होणार नाही हे लक्षात ठेवावे. मराठा समाजानेही लक्षात घ्यावं की आम्हीच सगळे प्रश्न सोडवले आहेत. ईडब्ल्यूएस आरक्षण आल्यापासून बऱ्यापैकी प्रश्न सुटलेला आहे. आपल्याकडे ईडब्ल्यूएसची मानसिकता तयार झालेली नाही त्यामुळे काही प्रश्न आहेत. आपण आरक्षण दिलेले आहे आणि ते कोर्टात टिकलेले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

लोकशाहीत प्रत्येकाला आपली मत मांडण्याचा अधिकार आहे. आंदोलन करण्याचाही अधिकार आहे. कोणतेही आंदोलन जोपर्यंत लोकतांत्रिक आहे त्याच्याशी कोणतीही अडचण नाही. लोकतांत्रिक पद्धतीने जेवढी आंदोलने होतील त्याला आमची ना नाही. त्याला आम्ही सामोरं जाऊ, आवश्यक तेवढी चर्चा करू, लोकशाहीच्या चौकटीत त्याच्यावर काय जे उपाय करता येतील ते करू. पण माझी एवढीच अपेक्षा आहे की कुठलेही आंदोलन लोकशाहीच्या चौकटी बाहेर जाऊ नये. त्यांनी निकषानुसार जर आंदोलन झाले तर आम्हाला काहीच अडचण नाही, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली.

सामाजिक आर्थिक परिवर्तनाची लढाई असेल तर मागणीचा योग्य प्रकारे विचार केला पाहिजे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## रायगडात दोन महिन्यांसाठी विनापरवाना ड्रोन वापरास बंदी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रातील संवेदनशील भागांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पुढील दोन महिन्यांसाठी जिल्ह्यात (पोलीस अधीक्षक रायगड कार्यक्षेत्रात) पोलीस विभागाची पूर्वपरवानगी शिवाय ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करण्यास बंदीचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.



पोलीस अधीक्षक यांच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, धरणे, केंद्रीय संस्था तसेच समुद्रालगतचे भाग हे दहशतवादी कारवायांसाठी संवेदनशील आहेत. पूर्वी देशातील विविध भागात दहशतवादी व विघातक कारवायांसाठी ड्रोनचा वापर झाल्याची उदाहरणे आहेत. रायगडमध्ये रात्रीच्या वेळी अनधिकृत ड्रोन उडवल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. ड्रोनद्वारे टेहळणी करून दहशतवादी हल्ले होण्याची शक्यता तसेचचोरी व अन्य गुन्ह्यांसाठी ड्रोनच्या माध्यमातून माहिती संकलनाची शक्यता आणि ड्रोनद्वारे केलेले चित्रिकरण विघातक कृत्यांसाठी वापरले जाण्याचा धोका लक्षात घेता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये हा आदेश जारी केला आहे. ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करावयाचा असल्यास व्यक्ती, संस्था वा आयोजकांनी सात दिवसांपूर्वी स्थानिक पोलीस ठाण्याला माहिती देवून परवानगी घेणे बंधनकारक राहील.

आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी जावळे यांनी स्पष्ट केले आहे.

## डॉ. अण्णा भाऊ साठेंच्या साहित्याचा जागर व्हावा -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रगण्य शिलेदार, आंतर्राष्ट्रीय दर्जाचे विचारवंत, विश्वविख्यात साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या वैश्विक मान्यतेच्या अलौकिक प्रतिभाशाली साहित्याचा परिसंवाद, चर्चासत्रे इ.उपक्रमांद्वारे शाळा महाविद्यालयातून तथा अन्य सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक व्यासपिठांवरून जागर व्हावा, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी केले.

मातंग चेतना परिषदेच्या वतीने साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त शेलघर येथे संपन्न झालेल्या जयंती सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या कसदार साहित्याची वाहवा करताना आपण स्वतः अण्णाभाऊंच्या साहित्याचे चाहते असून त्यांची ’फकीरा’ ही जगप्रसिद्ध कादंबरी आपल्याला अभ्यासाला होती याची आठवण सांगून ’ वारणेचा वाघ ’सारख्या अन्य साहित्य कृतींचा आजही समाजमनावर प्रभाव असल्याचे प्रतिपादन या वेळी केले. त्याचप्रमाणे आपल्या उलवे,नवी मुंबई परिसराम मध्ये साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे उत्तम दर्जाचे स्मारक व्हावे या समाजाच्या मागणीला त्यांनी पाठिंबा दर्शविला.

या वेळी पनवेलचे माजी नगराध्यक्ष भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, साई संस्थान वहाळचे अध्यक्ष रवीशेठ पाटील, जितेंद्र म्हात्रे, सचिन घरत, सचिन राजे आदी मान्यवर उपस्थित होते. (पान २ वर..)



**दै. रामप्रहर आणि मल्हार चॅनेलसोबत यंदाचा गणेशोत्सव साजरा करा...**

गणेशोत्सव बुधवार, दि.27 ऑगस्टपासून सुरू झाला आहे. या पर्वणीत आपल्या गणपतीचा फोटो दै. रामप्रहर आणि मल्हार चॅनेलवर **विनामूल्य** प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्यामुळे आपण आपल्या बाप्पाचा फोटो, सोबत **आपले नाव व पत्ता ramprahar@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवा.** फोटो चांगला असल्यास त्याला रामप्रहर आणि मल्हार चॅनेल या दोन्ही ठिकाणी विनामूल्य प्रसिद्धी देण्यात येईल.

राम प्रहर
दिवाळी २०२५
मुक्तछंद

मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.
चला तर लागूया कामाला...

ramprahar@gmail.com

# रायगड पोलिसांच्या ताफ्यात फॉरेन्सिक व्हॅन दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलाच्या तपास कामात आता अधिक वेग येणार आहे. पोलीस तपासात तांत्रिकदृष्ट्या पुरावे जमा करण्यासाठी रायगड जिल्ह्याकरीता पोलीस ताफ्यामध्ये फॉरेन्सिक व्हॅन दाखल झाली आहे. या व्हॅनमध्ये भौतिक, रासायनिक, जैविक व डिजिटल पुरावे गोळा करण्यासाठी अद्ययावत साधनसामग्री (किट्स) व सुसज्ज प्रशिक्षित स्टाफ नियुक्त करण्यात आलेला आहे. यामध्ये ३ सहायक रासायनिक विश्लेषक, ३ वैज्ञानिक सहायक तसेच वाहन चालक यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

रायगड पोलीसांकडे यापूर्वी अशी यंत्रणा उपलब्ध नसल्याने अनेकदा तपास कामात उशीर होत होता. अनेकदा उशीर झाल्याने पुरावे गोळा करण्यात अडचणी येत होत्या. आता फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध झाल्याने हे काम जलदगतीने होणार असून असून गुन्ह्यांचा शोध लावणे सोपे होणार आहे. रायगड जिल्हा कार्यक्षेत्रामध्ये घडणा-या गंभीर गुन्ह्यांच्या अनुषंगाने पुरावे जमा



करुन, न्यायालयाला सदरचे पुरावे सादर करुन, आरोपीला शिक्षा होण्यामध्ये महत्वाची भूमिका या व्हॅनद्वारे निभावली जाणार आहे.

या वाहनात सर्वसाधारण तपासणी कीट, पुरावे गोळा करून पॅक करण्याचे कीट, उच्च क्षमतेच्या विजेरी (बॅटरी), पावले आणि टायरच्या खुणा ओळखण्याचे कीट, रक्त आणि वीर्य शोध कीट, सायबर गुन्हे शोध कीट, अंमली पदार्थ शोध कीट स्फोटक पदार्थ शोध कीट असे विविध प्रकारचे गुन्ह्यांसंबंधी पुरावे गोळा करण्यासाठी लागणारे किट्स उपलब्ध आहेत. या किट्स द्वारे करण्यात येणारी तपासणी ही व्हॅनमधील सिसिटीव्ही कॅमेरा निगराणी अंतर्गत केली जाणार आहे. या फॉरेन्सिक व्हॅनच्या वर मागील बाजुस एक चारही दिशेला फिरणारा उच्च तीव्रतेचा प्रकाश देणारादिवा लावण्यात आला असल्याने रात्रीच्या वेळी सुध्दा पुरावे गोळा करण्यात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही.

ही फॉरेन्सिक व्हॅन ही २४ तास कार्यरत राहणार आहे. ही फॉरेन्सिक व्हॅन रायगड जिल्हा ताफ्यात दाखल झाल्याने गंभीर गुन्ह्यांच्या तपासामध्ये पुराव्यांच्या अनुषंगाने तांत्रिकदृष्ट्या अचुकता व सुलभपणा येणार आहे.या फॉरेन्सिक व्हॅनचे परिक्षण पोलीस अधीक्षक आँचल दलाल व अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक मिलींद खोपडे यांनी केले.

रायगड पोलीस दलाचा नवीन तंत्रज्ञानाच्या वापराकडे कल वाढतो आहे. उत्सवांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी रायगड पोलिसांनी एक नवा उपक्रम सुरू केला आहे. 'दृष्टी व्हॉट्सअॅप चॅट बॉक्स' या नावाने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांना आपल्या तक्रारी, सूचना व माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचवणे अधिक सोपे होणार आहे.

या माध्यमातून नागरिकांना केवळ उत्सव काळातील गर्दी, वाहतूक कोंडी किंवा संशयास्पद हालचालींचीच नव्हे तर रोजगार मटका, अवैध धंदे, अमली पदार्थांचा व्यापार यासारख्या गुन्हेगारी प्रकारांविरोधातही तक्रारी नोंदवता येतील. पोलिसांच्या नियंत्रण कक्षातून या संदेशांना थेट प्रतिसाद दिला जाणार असून संबंधित विभागाकडून आवश्यक ती तातडीची कारवाई होईल.

उत्सवांच्या काळात सुरक्षेची व कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी वाढते. अशा वेळी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिक आणि पोलिस यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. नागरिकांना या चॅट बॉक्सचा योग्य वापर करून सुरक्षा व्यवस्थेसोबतच समाजातील अवैध धंदे व अमली पदार्थांवर नियंत्रण आणण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## ऐन गणेशोत्सवात सुधागड तालुक्यात आठ तास बत्ती गुल

**पाली : प्रतिनिधी**

ऐन गणेशोत्सवात गुरुवारी (ता. २७) पहाटे चार ते दुपारी बारा वाजेपर्यंत सुधागड तालुक्याची वीज तब्बल आठ तास गुल होती. झाड व वीज पडल्याने विद्युत तारा तुटल्या आणि इन्सुलेटर फुटले त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला होता.

याबाबत सविस्तर माहिती अशी की वारा पाऊस यामुळे उंबरवाडी येथील जंगलात एका ठिकाणी झाड कोसळून विजेच्या तारा दोन ठिकाणी तुटल्या तर येथे दुसऱ्या ठिकाणी वीज पडून इन्सुलेटर फुटले व विजेच्या तारा तुटल्या परिणामी संपूर्ण सुधागड तालुक्यातील वीज पुरवठा पहाटे चार वाजता खंडित झाला. याबाबत पाली वीज वितरण कार्यालयाचे उपकार्यकारी अभियंता बालाजी चात्रे यांनी सांगितले की वीजपुरवठा खंडित झाल्यावर वीज महावितरणचे कर्मचारी लागलीच दोष (फॉल्ट) शोधण्यासाठी निघाले. त्यावेळी लक्षात आले की उंबरवाडी येथे फॉल्ट आहे. हे क्षेत्र पूर्ण डोंगराळ व दाट वनांचे आहे. त्यामुळे दोष झालेल्या ठिकाणी महावितरणचे कर्मचारी अथक परिश्रम घेऊन पोहोचले. त्या ठिकाणी पोचल्यावर लगेच झाड तोडण्याची तसेच वीज तारा जोडण्याचे आणि इन्सुलेटर बसवण्याचे काम सुरू करण्यात आले, यासाठी काही वेळ लागला. मात्र वीज महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून अखेर वीजपुरवठा पुन्हा सुरळीत केला असे उपकार्यकारी अभियंता



बालाजी चात्रे यांनी सांगितले.

ऐन गणेशोत्सवात तब्बल आठ तास वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे सुधागड तालुक्यातील जनता मेटाकुटीला आली होती.

### *पावसाळ्यात प्रमाण अधिक*

***पावसाळ्यात वीज खांबावर वीज कोसळल्यामुळे तीव्र उच्च दाबामुळे विद्युत यंत्रणेतील सुरक्षा कवच असणाऱ्या या इन्सुलेटर्सना तडे जातात व ते फुटतात. म्हणून पावसाळ्यात वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढते. तेव्हा नेमका बिघाड शोधण्याकरीता रात्री-अपरात्री वीज कर्मचा-यांना गस्त घालावी लागते, कसून तपासणी करावी लागते. ती विद्युत वाहिनी कधी रस्त्याकडेने, कधी शेतातून, झाडी वनांतून तर कधी ओढयातून, डोंगरातून गेलेली असते.***

## गणेशोत्सवात माणगावच्या बाजारात मधमाश्यांचे फळांचे रससेवन

**माणगाव : बातमीदार**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर माणगांव बाजारपेठेत नेहमीप्रमाणेच सणासुदीची लगबग दिसून येत आहे. किराणा, स्टेशनरी, कटलरी, इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर, फुले व फळांच्या दुकानांवर खरेदीसाठी ग्राहकांची प्रचंड गर्दी उसळली आहे. या गर्दीत यंदा एक आगळंवेगळं दृश्य ग्राहकांना आश्चर्यचकित करत आहे.

फळांच्या दुकानावर साधारणत: भय निर्माण करणाऱ्या मधमाश्या स्थानिक भाषेत 'आग्या मोहोळ' फळांचा गोडवा चाखताना दिसत आहेत. साधारणपणे मधमाश्यांचा विचार करताच मनात डंखाचा धसका निर्माण होतो; पण या काळात माणगांव बाजारपेठेतल्या फळांच्या स्टॉलवर गजबजलेल्या वातावरणात मधमाश्या कोणताही उपद्रव न करता शांतपणे पिकलेल्या फळांचा रस पिताना दिसत आहेत.

मुख्यत: सीताफळ, चिकू, द्राक्षे, सफरचंद, अंजीर यांसारख्या गोडसर फळांचा रस शोषून मधमाश्या तृप्त होत आहेत. विशेष म्हणजे, फळविक्रेतेही या मधमाश्यांना त्रास मानत नाहीत परंतु गणपती बाप्पाला फळांचा नैवेद्य-प्रसाद म्हणून फळे खरेदी करण्यास येणारे ग्राहक थोडेफार घाबरून आश्चर्यचकीत होत आहेत. गजबजलेल्या वातावरणात मधमाश्यांचे हे अनोखे फळरस-



सेवनाचे दृश्य ग्राहकांसाठी कुतूहल निर्माण करणारे ठरत आहे.

पर्यावरणात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या ह्या ज्या मधमाश्या आहेत ह्यांना रॉक बी किंवा मग जायंट हनी बी असे म्हणतात, ह्यांचे शास्त्रीय नाव आहे एपिस डॉर्साटा स्थानिक भाषेत मराठीत ह्यांना आग्या मोहोळ म्हटले जाते ह्या सर्वात मोठ्या आकाराच्या असतात, ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यांच्या मोसमात आपल्याकडे कोकणात बहुतांश वन्य फुले मोठ्या संख्येने फुलतात त्यातून ह्या मधमाश्या परागकण गोळा करत फिरतात, परंतु सध्याच्या पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे अजून तरी इतक्या मोठ्या प्रमाणावर रानावनात माळांवरून फुले फुललेली नाहीत.

त्यामुळे परागकण (नेक्टर) किंवा अमृताची कमतरता असल्यामुळे ह्या मधमाश्या बाजारपेठेतील फळांच्या दुकानांवर आकर्षित होऊन इथल्या जास्त पिकलेल्या फळांमधून रस शोषित आहेत. गणेशोत्सवाच्या या काळात मधमाश्यांमुळे फळविक्रेते तसेच गिऱ्हाईक कोणालाही उपद्रव होत नसून, फळवाले मधमाश्यांना अन्नाची कमतरता असल्यामुळे स्वतःहून काही फळे देखील देत आहेत. असे माणगांव चे वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांनी सांगितले आहे.

***ह्या मधमाश्या दर वर्षी श्री गणेश उत्सवाच्या काळात आमच्या फळाच्या दुकानात येतात, त्यांच्यासाठी आम्ही वेगळी फळे काढून ठेवतो त्या येतात फळांमधून रस चोखतात आणि कोणत्याही उपद्रवाविना निघून जातात. साधारण पाऊस संपण्यापूर्वी रानावनांत फुले फुलण्यापूर्वीच्या ह्या काळात ७-८ दिवस दर वर्षी मधमाश्या दुकानात येतात***

***-मुजाहिद, फळविक्रेते***

# दीड दिवसाच्या बाप्पाला भक्तीपूर्ण वातावरणात निरोप

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या बल्लाळेश्वर पाली व सुधागडात गणेश उत्सवात अत्यंत प्रसन्न, मंगलमय असे धार्मिक वातावरण पहावयास मिळते. गणरायाचं आगमन व विसर्जन यावेळी गणेशभक्त भावुक होताना दिसतात. पाली सुधागडात दीड दिवसांच्या बाप्पाचे दि. (२८) गुरुवारी दुपारनंतर भक्तीपूर्ण वातावरणात पाली आंबा नदी तसेच पारंपरिक विसर्जन स्थळी विसर्जन करण्यात आले.



बुधवारी बाप्पा गणरायाचे आगमन झाले. त्यावेळी भक्तांनी विविध पारंपरिक वाद्यांसह नाचत गाजत बाप्पाला घरी आणले होते. दीड दिवसांचा पाहुणचार घेऊन बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. दुपारनंतर पाली परळी जांभूळपाडा, नांदगाव व संपूर्ण सुधागड तालुक्यातील गाव खेड्या पाड्यात तसेच अलिबाग, पेण, पनवेल, उरण, कर्जत, खालापूर, रोहा, माणगाव, म्हसळा, तळा, महाड, श्रीवर्धन, पोलादपूर, मुरुड अशा १५ तालुक्यांत विसर्जनाची लगबग सुरु झाली होती. दीड दिवसांचा पाहुणचार घेतल्यानंतर टाळ, मृदुंगाच्या गजरासह डिजे आणि ढोल-ताशांच्या तालावर दीड दिवसांच्या बाप्पाला निरोप देण्यात आला.

## *रसायनीत गणरायाला भजन वादनाच्या तालावर निरोप*

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी व आसपासच्या परिसरातील दिड दिवसांच्या गणरायाचे भक्तिभावाने विसर्जन करण्यात आले.दुपारी तीन वाजल्यापासून मोहोपाडा तलाव,रिस पुल,कांबा पुल,पाताळगंगा नदी ,वावेघर घाट, गुळसुंदे, वाशिवली, लोहोप,कासप,बारवई पुल आदी ठिकाणी गणरायांचे विसर्जन करण्यात आले. ढोल ताशे,टाळ मृदुंगाच्या गजरात भक्तगणांनी बाप्पाला निरोप दिला.

मोहोपाडा तलावावर २०८,रिस पुल-१३६,कांबे पुल-३८,पाताळगंगा-



७६,वावेघर-२५,गुळसुंदे-६२,तळेगाववाडी-५६,कासप-१९ गणरायांना भावपुर्ण निरोप देण्यात आला.रसायनी पोलिसांनी विसर्जनस्थळी चोख पोलिस बंदोबस्त तैनात केला होता. काही विसर्जनस्थळी रोटरी क्लबच्यावतीने निर्माल्य ठेवण्यात आले होते.

## कर्जत तालुक्यातील १९७२ गणरायांचे विसर्जन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात ९२१० गणरायांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली असून आज सार्वजनिक व खाजगी अशा एकूण दीड दिवसांच्या १९७२ गणरायांचे सश्रूनयनांनी 'पुढच्या वर्षी लवकर या' च्या गजरात विसर्जन करण्यात आले.

विसर्जनाच्या वेळी पावसाने उघडीप दिल्याने श्री गणेशमूर्ती वाजत गाजत गणेश घाटांवर आणण्यात आल्या. तालुक्यात एक सार्वजनिक व १९७१ खाजगी अशा १९७२ दीड दिवसांच्या गणरायांचे विसर्जन करण्यात आले.



यापैकी १२३७ कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील, ६९५ नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आणि ३९ माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अशा १९७१ खाजगी गणरायांचे व माथेरान मधील एकमेव सार्वजनिक श्री गणेशमूर्तीचा समावेश आहे.

पान १ वरुन

## डॉ. अण्णा भाऊ साठेंच्या साहित्याचा जागर व्हावा -लोकनेते रामशेठ ठाकूर

या जयंती सोहळ्याला महाराष्ट्र विधान परीषदेचे तालिका सभापती आमदार अमित गोरखे यांनी धावती भेट दिली आणि विश्वव्याख्यात साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या नवी मुंबईतील स्मारकासाठी शासनाकडे पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले.

प्रमुख वक्ते डॉ. बळीराम गायकवाड यांनी डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनावर विविध उपक्रम मुंबई विद्यापीठाच्या अध्यासन केंद्राच्या वतीने राबवले जात असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.आनंद व्यंकटराव शिंदे यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे उलवे, नवीमुंबई परिसरामध्ये उत्कृष्ट दर्जाचे स्मारक व्हावे या दृष्टीने आपण सर्वांनी निर्धार व्यक्त करून पाठपुरावा करण्यासाठी एकीची वज्रमूठ घट्ट करावी, असे आवाहन केले.

जयराम वाघमारे, रामदास कांबळे, जगदिश सोनटक्के, किशोर अल्हाट, फकीरा पँथरचे संस्थापक अॅड. गुरु सूर्यवंशी आदींची भाषणे झाली. नंदकुमार आवळे यांचे काव्यवाचन झाले. मातंग चेतना परीषदेचे संस्थापक डॉ. आनंद व्यंकटराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या जयंती सोहळ्याचे प्रास्ताविक अमित कुचेकर यांनी केले तर राष्ट्रीय लहुशक्तीचे सरचिटणीस सागरकुमार रंधवे यांनी डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य आणि जीवनातील प्रसंगांचा विश्लेषणात्मक वेध घेत ओघवत्या शैलीत केलेले सूत्रसंचालन उपस्थितांना भावले.


या वेळी अॅड. अरविंद मस्के, अभंग शिंदे, डॉ.राजाराम भोसले, अमित कुचेकर, आदित्य शिंदे, संतोष थोरात, सागर वाघमारे, प्रमोद वाघमारे, सचिन सुराडकर, रमेश कदम, सचिन भिसे, जयसिंग घेवदे, दिलीप पाटोळे, कोंडीबा दोरवे, उद्धवजी बळे, मधुकर यादव, सुरेंद्र साठे, गणेश आवळे, राहुल चांदणे आदी आयोजन समितीतील सदस्य व मान्यवर आणि महिला व युवक उपस्थित होते.

## रोहा तालुक्यात गणरायाला भावपूर्ण निरोप

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील दीड दिवसाच्या गणपतीला भावपूर्ण निरोप देण्यात आले. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशी अर्थ हाक गणेश भक्तांचे गणराया देताना दिसून आले.रोहा शहरासह तालुक्यातील कोलाड, सुतारवाडी, खांब, नागोठणे, मेढा, देवकान्हे, यशवंतखार, धाटाव, चणेरा, घोसाळे आदी ग्रामीण भागात गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आले

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात पारंपारिक खालु बाजा वाद्य, ताशा, व टाळ



वाजवीत गणरायाला विसर्जन ठिकाणी घेऊन येताना दिसत होते.

रोहा शहरातील मोरे अळी, अंधार आळी, धनगर आळी, दमखाडी, धावीर रोड येथील गणपती विसर्जन करण्यात येत होते.रोहा शहरातील गणपती विसर्जन घाट नगरपरिषदेच्या वतीने येथे लाईटची व्यवस्था करण्यात आली होती.

## सुरेश बुवा ठाकूर यांचे निधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुरेश बुवा ठाकूर यांचे बुधवारी (दि.२७) अल्पशा आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आशा ठाकूर, मुली दिपाली ठाकूर, प्रणाली ठाकूर, श्वेता ठाकूर, मुलगा ॐकार ठाकूर असा परिवार आहे.

देवसागर साधक समाज इंचगिरी सांप्रदायाचे गुरुबंधु शिवाजी नगर (न्हावेखाडी) पनवेल सुरेश बुवा यांनी लहान पणापासुन आपल्या माऊली मंदिरात भजन आरती बाराअभंग सहाची आरती असे सगळे कार्यक्रम



करण्याची आवडीने करत असे. सन २००२ साली त्या स्वतः च्या आवाजात माऊली कृपेने श्री बाळकृष्ण माऊलींची नित्याचे कार्यक्रमाची सुमधुर आवाजात गायली.

संगीतकार मनोहर मसणे आणि निलेश वाघमारे, राजन चौधरी तसेच दिलीप बुवा म्हात्रे, श्री कृष्ण, श्री चिमणे अशा सगळ्यांची मेहनत आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे असलेले आशीर्वाद आणि आर्थिक पाठबळ यामुळे सुरेश बुवा आणि रत्नप्रभा घरत आणि मंडळी यांच्यासोबत व्हिडिओ कॅसेट काढण्यात आली. ही व्हिडिओ युट्युब चॅनेल ऐकायला आणि पहायला मिळते.

# पनवेल मनपा क्षेत्रात दीड दिवसाच्या गणपतींना निरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात सुमारे ५६० पेक्षा अधिक (संध्याकाळी साडेसहापर्यंत) दीड दिवसाच्या घरगुती गणपतींचे भाक्तिमय वातावरणात नियोजनबध्दरित्या शांततेत विसर्जन करण्यात आले.

माझी वसुंधरा ६.० अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी पनवेल महानगरपालिका विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच सणांचे पावित्र्य आणि पर्यावरणाचे भान राखले जावे यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी 'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा' ही मोहिम हाती घेतली आहे. गणेशभक्तांच्या सोयी – सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग,पर्यावरण विभाग या आठ विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवरती संपूर्ण तयारी करण्यात आली होती. याकामी विविध एनजीओ, सामाजिक संघटनादेखील महापालिकेस सहकार्य करत आहेत. यावर्षी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या वतीने एकुण १३४ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. यामध्ये ५८ ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून ७६ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली आहे. या सर्व विसर्जनाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटिव्ही स्टेज, टॉवरची सोय, टेबल खुर्च्या, लाऊड स्पीकर, निर्माल्य कलश, लाईव्ह जॅकेटची सोय करण्यात आली आहे.

दरम्यान, विसर्जन कार्यक्रम सुरळित पार पडावा यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, चारही प्रभाग अधिकारी यांनी पालिकेच्या सर्व विसर्जन ठिकाणांना भेटी देऊन व्यवस्थेचे निरीक्षण केले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विसर्जन घाटांवर गणपतींचे सुरळीत विसर्जन व्हावे यासाठी महापालिकेच्या वतीने अग्निशमन दल, वाहतूक विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, घनकचरा व आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, सफाई कर्मचारी, मुख्यालय कर्मचारी तसेच पोलीस विभागाच्या वतीने चोख बंदोबस्त करण्यात आला आहे. तसेच वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने प्रत्येक विसर्जन स्थळांवरती प्राथमिक उपचारार्थ सेवा देण्यात येत आहे.





पनवेल : माजी नगरसेवक जगदीश गायकर आणि विजय द. गायकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले.



पनवेल : धरणा कॅम्प येथील राजेंद्र रघुनाथराव कदम व गणेश राजेंद्र कदम यांच्या घरातील विराजमान गणराय व आकर्षक देखावा.



ॲड. स्वप्निल जाधव, पनवेल



उरण : येथील मकरंद पोतदार व कुटुंबीय यांच्या निवासस्थानी विराजमान श्री गणरायाचे आमदार महेश बालदी यांनी दर्शन घेतले.

## गणेश दर्शन





























पनवेल : लाडक्या बाप्पाचे मोठ्या जल्लोषात बुधवारी आगमन झाले. यानिमित्त महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दीड दिवसाच्या घरगुती बाप्पांचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे घरोघरी स्वागत करण्यात आले.



रसायनी : आपटा येथील श्री बापूजी देवस्थानच्या मंदिराच्या आवारात आपटा गावातील सर्व दीड दिवसाच्या गणपतींचे विसर्जन करण्यात आले. येथे मोठी सार्वजनिक आरती केली, त्यानंतर पातांळगंगा नदीमध्ये गणपती विसर्जन करण्यात आले.



पनवेल : येथून प्रकाशित होणाऱ्या पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष तथा संपादक रत्नाकर पाटील यांच्या रायगड शिव सम्राट वृत्तपत्राच्या आरती संग्रहाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी पत्रकार सुभाष वाघपंजे, उमेश पाटील, शशिधर माळी उपस्थित होते.

## उरणमध्ये दीड दिवसाच्या बाप्पाला निरोप

**उरण : वार्ताहर**

गणपती बाप्पाचे आगमन बुधवारी गणेश चतुर्थी दिवशी झाले. दीड दिवसाच्या गणरायाला गुरूवारी (दि.२८) निरोप देण्यांत आला.

उरण नगर परिषदेच्या वतीने मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विमला तलाव, भोवरा तलाव व मोरा जेट्टी येथे चांगली व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येक ठिकाणी कर्मचार्यांची व्यवस्था करण्यात आली होती. जेणे करून नागरिकांना गणपती बाप्पाचे विसर्जन करतांना कोणतीही गैरसोय होणार नाही त्याकडे लक्ष दिले जात होते.

उरण नगरपरिषदेच्या वतीने या वर्षा पासून प्लास्टर ऑफ पॅरीसच्या गणेशमूर्ती विसर्जन करण्यासठी कृत्रीम तलावाची उभारणी केली होती त्यामध्ये मूर्ती विसर्जन करण्यात आल्या.



शाडूच्या मातीपासून बनविल्या गणेशमूर्ती विमला तलावात विसर्जन करण्यात आल्या. या कामी उरण शहरातील देवूळवाडी तील गणपती विसर्जन मित्र मंडळ यांनी आलेल्या गणेश मूर्तींचे विसर्जनाचे काम व्यवस्थित केले.

या वेळी मुख्याधिकारी समीर जाधव, राजेंद्र घाडगे, विशाल गायकवाड, संजय परदेशी, हर्षद कांबळे, संदेश शिरकुरकर, आकाश कवडे, सुनील जाधव, धनेश कासारे, हितेंद्र जाधव, नितीन मोहिते, दीक्षय गायकवाड, गणपती विसर्जन मित्र मंडळ देऊळवाडी सर्व सदस्य, नागरिक संरक्षण दल, रायगड चीफवार्डन नवीन राजपाल व सयंसेवक उपस्थित होते.

संपादकीय

# फटका अमेरिकेलाही

रशियाकडून तेलखरेदी करण्याची शिक्षा म्हणून अमेरिकेने भारतावर लादलेले अतिरिक्त २५ टक्के आयातशुल्क बुधवारपासून लागू झाले. अमेरिकेने भारतावर लादलेल्या एकंदर ५० टक्के आयातशुल्काने आपल्या शेअरबाजारात गुंतवणूकदारांच्या भावनांना धक्का पोहोचल्याचे दिसून आले. या वाढीव करांचा फटका भारतातील काही विशिष्ट क्षेत्रांतील निर्यातीला बसणार आहे. परंतु जगभरातील देशांवर आयातशुल्क लादण्याच्या ट्रम्प यांच्या या अतिरेकी धोरणाचा मोठा फटका अमेरिकी जनतेलाही बसणार आहे. त्यामुळे अमेरिकेत सध्या गोंधळाचे वातावरण आहे.

**भारतातून अमेरिकेत आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के शुल्क लागू केले असतानाच, भारतावर रशियाच्या युक्रेनविरोधी युद्धाला अर्थसाह्य करत असल्याचा आरोप करत आणखी २५ टक्के शुल्क लादण्याचा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता. त्यासाठी २७ ऑगस्ट ही तारीखही जाहीर करण्यात आली होती. मधल्या काळात भारत–अमेरिकेदरम्यान व्यापार करारात प्रगती न झाल्याने आधी जाहीर केल्याप्रमाणे ट्रम्प प्रशासनाने वाढीव आयातशुल्काची नोटीस मंगळवारी जारी केली. वास्तविक चीनवर दबाव आणण्यासाठी ट्रम्प यांनी आयातशुल्काचे हे धोरण सुरु केले. यातून अमेरिकी उत्पादनाला चालना मिळेल असा त्यांचा दावा होता. प्रत्यक्षात मात्र याचा मोठा आर्थिक फटका अमेरिकी ग्राहकांना बसणार असल्याचे दिसते. त्यामुळेच अमेरिकेतील सर्वसामान्य लोक अतिशय गोंधळून गेले आहेत. ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' म्हणत या धोरणाची घोषणा केली होती. त्यामुळे तेथील नागरिकांच्या अपेक्षा उंचावल्या. ट्रम्प यांच्यामुळे तेथील लोकांना नोकरीच्या संधी वाढतील अशी हवा निर्माण झाली होती. परंतु तसे काही होण्याआधी अमेरिकी नागरिकांना वाढलेल्या महागाईला तोंड द्यावे लागणार आहे. कुठल्याही देशातून आयात होणाऱ्या मालावर जास्तीचे शुल्क लावले गेले तर त्या देशातून आयात होणाऱ्या वस्तूंची किंमत अमेरिकेत वाढणार आहे. भारतातून आयात होणारे कापड, तयार कपडे, हिरे आणि दागिने, कोळंबी, चामडे आणि पादत्राणे, प्राणीजन्य उत्पादने, रसायने आणि इलेक्ट्रिक व अभियांत्रिकी यंत्रसामग्री यांना याचा फटका बसणार आहे. तर औषधे, ऊर्जा आणि इलेक्ट्रॉनिक उत्पादनांना या वाढीव शुल्कातून सूट देण्यात आली आहे. भारतावरील वाढीव शुल्कामुळे अमेरिकी बाजारपेठेतील भारताच्या काही प्रतिस्पर्धी निर्यातदार देशांना फायदा होण्याची शक्यताही वर्तवली जाते आहे. बांगलादेश, व्हिएतनाम, थायलंड, म्यानमार या देशांचा उल्लेख यासंदर्भात करता येईल. या देशांवरही अमेरिकेने वाढीव शुल्क लादले असले तरी भारतावरील शुल्क हे सर्वाधिक आहे. भारताची सर्वाधिक निर्यात गेली तीन–चार वर्षे अमेरिकेला होताना दिसली आहे. यापैकी जवळपास ३६ टक्के निर्यातीला वाढीव शुल्काचा फटका बसण्याचा अंदाज देशाच्या वाणिज्य सचिवांनी वर्तवला आहे. मात्र, ट्रम्प यांच्या या धोरणाचा परिणाम अमेरिकेतील ग्राहकांवरच नव्हे तर तेथील उद्योगांवरही होणार आहे. आयातशुल्क वाढले की महागाई वाढते. पाठोपाठ अमेरिकी फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरात वाढ केली जाईल. परिणामस्वरूपी तेथील सगळ्या प्रकारची कर्जे महाग होतील. त्यामुळे अमेरिकी अर्थतज्ज्ञ ट्रम्प यांच्या या धोरणाचा परिणाम अमेरिकेच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होणार असल्याचा इशारा देत आहेत. जागतिकीकरणाच्या आजच्या काळात अमेरिका राबवत असलेल्या या 'संरक्षणवादाला' अन्य देशही प्रत्युत्तर देण्याच्या तयारीत आहेत. युरोपियन महासंघ अमेरिकेविरोधात प्रतिआयातशुल्क लादण्याची शक्यता आहे. एकंदरच जागतिक व्यापारातील गोंधळ व जोखीम यातून वाढणार आहे. म्हणूनच जागतिक अर्थव्यवस्थेसाठीही हा धोक्याचा इशारा आहे.**

# गणेशोत्सव : महाराष्ट्र राज्य महोत्सव




यंदा राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' दर्जा दिल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळख अधिक गडद होणार आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार आहे. महाराष्ट्रामध्ये गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो, जिथे तो एक सार्वजनिक उत्सव बनला आहे. १९ व्या शतकात, लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला एक सार्वजनिक सण म्हणून सुरू केले, ज्यामुळे तो अधिक लोकप्रिय झाला. विशेषतः मुंबई – पुण्याचा गणेशोत्सव जगप्रसिद्ध आहे. जगात आणि देशात आपल्या गणेशोत्सवाची ओळख सर्वात मोठा महोत्सव म्हणून झालेली आहे. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून घोषित केला आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. महाराष्ट्र शासनाने यंदा गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केल्याने विशेष आनंद आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती गणेशोत्सवात सहभागी असते. आता 'गणेशोत्सव' प्रथमच राज्य शासन साजरा करत असल्याने हा उत्सव आता अधिक व्यापक प्रमाणात साजरा करून त्यात लोकसहभाग वाढवावा हा मुख्य उद्देश आहे. यासाठी प्रत्येक विभागांनी विविध उपक्रमातून आपली सहभागीता वाढवून आपापल्या समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी करावी, अशा सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सर्व राज्य आणि केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता २२ देशांमध्ये साजरा होतो. सार्वजनिक तसेच घरगुती पद्धतीने आणि आता राज्य शासनामार्फतही साजरा होणारा हा गणेशोत्सव सर्व धर्म, जात, भाषांना जोडणारा उत्सव असावा. या गणेशोत्सव काळात तालुका ते राज्य स्तरावरील विविध सांस्कृतिक स्पर्धांसाठी १० कोटी रुपयांची बक्षिसे ठेवली गेली असून समाज माध्यमांवरून विशेष मोहीम राबवली जात आहे. पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीतर्फे उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कृत करणे. राज्यातील सुमारे ४८० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सुमारे १.५० कोटी रुपये इतक्या रकमेची पारितोषिके वितरित करण्यात येणार आहेत.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रत्येक विभागाने नाट्य, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील वर्ल्ड युनेस्कोचा दर्जा मिळालेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना असे विषय घेऊन कार्यक्रम राबविण्यात यावेत. घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सवाचे फोटो–व्हिडिओ जगभरातून अपलोड करता यावेत, यासाठी विशेष प्लॅटफॉर्म तयार करण्यात येत असून यात प्रमुख मंडळांचे थेट प्रक्षेपण सुद्धा उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर चित्रपट महोत्सव, शैक्षणिक कार्यक्रम आदी विषयांवर निबंध, चित्रकला, ब्लॉग स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात, अशा सूचनाही शासनाने दिल्या आहेत.

गणेशोत्सवाच्या १० दिवसांच्या काळात आपापल्या विभागात विशेष उपक्रम, स्पर्धा, रोषणाई आदींसह विशेष उपक्रम अंतर्गत ऑपरेशन सिंदूरद्वारे माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करण्यात यावा. तसेच आत्मनिर्भर भारत व स्वदेशी संकल्पना यांचा गौरव करण्यात यावा, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

गणेशोत्सवाला राज्य महोत्सव दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळख अधिक घट्ट होणार आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार आहे. वर्षानुवर्षांची परंपरा असलेला गणेशोत्सव यावर्षी राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यास शासनाची यंत्रणा सज्ज झाली असून गणेशोत्सव मंडळे व घरगुती गणेश आरास स्पर्धा, चौकाचौकात रोषनाई, ड्रोन शो, विविध सांस्कृतिक कार्यक्रम अशा प्रकारे जल्लोषात गणेशोत्सव साजरा होणार आहे.

शासन निर्णयानुसार तालुका स्तरापासून राज्य स्तरावर विविध गणेशोत्सव मंडळ जे धार्मिक प्रथा परंपरानुसार सहभागाने पर्यावरणपूरक आणि सामाजिक उपक्रमात काम करणाऱ्या गणेशोत्सव मंडळांना पारितोषिकाची घोषणा केली आहे. तसेच गिरगाव चौपाटीवर ड्रोन महोत्सव आयोजन करण्यात येणार असून पुणे, नाशिक, नागपूर, मुंबई आणि राज्यातील सर्व भागात स्थानिक स्तरावर शक्य असेल त्या सार्वजनिक ठिकाणी रोषणाई करण्यात येणार असून गणेशोत्सव काळामध्ये भजनी मंडळांना भजनामधील साहित्यासाठी थेट लाखो रुपयांचे अनुदान देण्याची योजना घोषित झाली आहे. परदेशातही गणरायाचे आगमन धुमधडाक्यात व्हावे, म्हणून हा राज्य महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा व्हावा, ही भूमिका घेण्यात आली आहे.

या महोत्सवांतर्गत, महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राज्य, जिल्हा, तालुका या तीनही स्तरांवर होणार आहे. वजेत्या मंडळांना तालुकास्तरावर एक, जिल्हा व राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांनी गौरविले जाणार आहे

यासोबतच, महाराष्ट्रातील घरगुती गणपतीचे दर्शन, सार्वजनिक गणपतीचे दर्शन व विविध प्रसिद्ध गणेश मंदिरातील गणपतींचे लाईव्ह दर्शन अकादमीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या ganeshotsav.pldmka.co.in पोर्टलद्वारे घरबसल्या घेता येणार आहे. आपल्या घरगुती अथवा सार्वजनिक गणेशोत्सवाचे छायाचित्र या पोर्टलद्वारे विनामूल्य प्रसिद्ध करता येईल. गणेशोत्सवात यंदा शासनाचा सहभाग मोठ्या प्रमाणात राहणार आहे. गणेशोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले असून शासकीय आस्थापनाच्या इमारती, वारसास्थळांवर या बोधचिन्हाची रोषणाई करण्यासोबत महत्त्वाच्या चौकाचे सुशोभीकरण करुन रोषणाई करावी. संपूर्ण राज्यभर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. महाराष्ट्राची कला व संस्कृती आणि परंपरेचे दर्शन या कार्यक्रमांतून घडेल. हे कार्यक्रम फक्त महाराष्ट्रातच नाही तर महाराष्ट्राबाहेर ज्या ठिकाणी मराठी बांधव मोठ्या प्रमाणात आहेत त्या ठिकाणीही करण्यात येत आहेत. तसेच मराठी भाषिक बहुल भारताबाहेरील काही देशामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने अध्यात्म नाट्यरंग महोत्सवाचेही आयोजन करण्यात येत आहे. ज्या चित्रपटांमधून गणपती विषयक परंपरा, कला संस्कृती दर्शवलेली आहे, अशा चित्रपटांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. गणेशोत्सवावर आधारित टपाल तिकीट आणि नाणे काढण्यात येईल. संपूर्ण राज्यभरातून गणपतीविषयक रिल्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. 'ड्रोन शो' चे आयोजन करण्यात आले आहे. या राज्य महोत्सवाची माहिती संपूर्ण देशभर व्हावी यासाठी वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, रेडिओ आणि समाज माध्यमे यांच्या माध्यमातून देशभरात प्रचार प्रसिद्धी करण्यात येत आहे.

आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विशेष कार्यक्रम, उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. उत्सवाच्या दरम्यान प्रमुख ठिकाणी विद्युत रोषणाई व सुशोभिकरण करण्यात येणार आहे. पारंपरिक भजन व आरती सादर करणाऱ्या भजनी मंडळांना साहित्य वाटप, अनुदान देण्यात येणार आहे. राज्यस्तरीय भजन स्पर्धे चे आयोजन करण्यात येत आहे. ा,उपक्रम राबविण्यात येत आहे.

यंदाच्या गणेशोत्सवात ७ दिवस रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत परवानगी जिल्हाधिकाऱ्यांना परवानगी देण्यात आली आहे. विसर्जन मार्गावर ड्रोन शोचे आयोजन, जाहिरात फलकांवर सामाजिक संदेश देण्याची कार्यवाही करावी. विदेशी विद्यार्थी, नागरिक, विदेश दुतावासातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित करावे. तयारी करावी.

**–अनिल आलुरकर**

उपसंचालक विभागीय माहिती कार्यालय, अमरावती




## अमेरिकेला निर्यात होणाऱ्या सर्व आयफोनचे भारतात उत्पादन



टेक जायंट कंपनी ॲपल भारतात आयफोन १७च्या सर्व चार मॉडेल्सची निर्मिती करत आहे. कंपनी येत्या सप्टेंबर महिन्यात हा फोन लॉन्च करणार आहे. लॉन्चिंगनंतर या फोनचे सर्व व्हेरिएशन्स, दोन्ही प्रो व्हर्जन्स भारतातून अमेरिकेत पाठवले जातील असं ब्लूमबर्गने सूत्रांच्या हवाल्याने म्हटलं आहे. कंपनीने त्यांच्या भारतातील सर्व पाच कारखान्यांमधील उत्पादन वाढवलं आहे. कंपनीला अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या आयफोन्सची निर्मिती चीनमध्ये करायची नाही. त्यामुळे कंपनीने चीनऐवजी इतर देशांकडे मोर्चा वळवला आहे. यामध्ये भारताला प्राधान्य दिलं जात आहे.

ॲपलने एक व्यापक धोरण आखलं आहे. ज्याद्वारे ॲपल कंपनी अमेरिकेत विकली जाणारी सर्व उत्पादनं चीनऐवजी भारतात निर्माण करणार आहे, परंतु आता अमेरिकेने भारतावर लादलेलं आयात शुल्क (टॅरिफ) हे कंपनीसमोरचं मोठं आवाहन आहे. यामुळे कंपनीला १.१ बिलियन डॉलर्सचा फटका बसण्याची शक्यता आहे.

आगामी काळात भारतात निर्मिती होणाऱ्या आयफोन्सपैकी अर्ध्याहून अधिक आयफोन्स हे टाटा समूहाच्या नियंत्रणाखाली असलेल्या भारतातील कारखान्यांमध्ये तयार केले जातील असंही ब्लूमबर्गने म्हटलं आहे. टाटाच्या तमिळनाडूमधील होसूर येथील कारखान्यात आणि फॉक्सकॉन टेक्नोलॉजी ग्रुपच्या बंगळुरू विमानतळाजवळील उत्पादन केंद्रात मोठ्या प्रमाणात आयफोन्सची निर्मिती केली जाईल.

जगभरात निर्माण झालेला भू–राजकीय तणाव, व्यापाराच्या क्षेत्रातील अमेरिका व चीनमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ॲपल कंपनीला त्यांच्या उत्पादनाची ठिकाणं बदलावी लागली आहेत. कंपनी आता चीनऐवजी भारतात निर्मितीवर अधिक लक्ष देत आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या सरकारने आयफोनसारख्या इलेक्ट्रॉनिक्सला टॅरिफपासून सूट दिली असली तरी ही उपकरणे अमेरिकेत विकत असताना कंपनीला स्वतंत्र शुल्काचा सामना करावा लागू शकतो. कंपनीने मार्च २०२५पर्यंत भारतात २२ बिलियन डॉलर्स किमतीच्या आयफोन्सचं उत्पादन केलं आहे. कंपनी जगभरात आयफोन्सचं जितकं उत्पादन करत आहे त्यात एकट्या भारताचा वाटा २० टक्के इतका आहे.

# चित्रपट अभिनेत्री जयश्री गडकर



निमित्त

मराठी चित्रपटसृष्टीतील नृत्यांगना जयश्री गडकर यांच्या जीवनावर आणि प्रवासावर आधारित आहे. जयश्री गडकर एक प्रसिद्ध मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री जयश्री गडकर. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया लेखातून त्यांच्याविषयी...


या १९५० ते १९८० च्या दशकापर्यंत ती मराठी चित्रपटाची आयकॉन होत्या. भारतातील कर्नाटक राज्यातील उत्तरा कन्नड जिल्ह्यातील कारवारपासून जवळ असलेल्या कनसगिरी येथील एका कोकणी भाषिक कुटुंबात जयश्रीचा जन्म २१ मार्च १९४२ रोजी झाला.

रामानंद सागर यांच्या मागील रामायण या दूरदर्शन मालिकेत जयश्रीने कौशलची भूमिका साकारली होती. त्यात राजा दशरथच्या भूमिकेसाठी प्रसिद्ध असलेला अभिनेता बाळ धुरी आणि जयश्री यांचा विवाह झाला होता. गडकर यांनी तरुण असतानाच नृत्यांगना म्हणून व्यवसायाला सुरुवात केली. चित्रपटांमध्ये तमाशा नृत्यांगना व्हा. त्यांचा पहिला भाग १९५५मध्ये आलेल्या व्ही. शांतारामचे वडील पायल हे बाजे येथील नृत्य गटाचे सदस्य होते, ज्यामध्ये जयश्रीने प्रमुख भूमिका साकारली होती. १९५६मध्ये वयाच्या चौदाव्या वर्षी दिसतं तसं नसतं या चित्रपटाद्वारे अभिनयक्षेत्रात पदार्पण झाले. नंतर दिनकर पाटील दिग्दर्शित सीतां तसम नसथन या मराठी चित्रपटात ती राजा गोसावी यांच्यासोबत एका छोट्या नृत्याच्या भूमिकेत दिसली. त्यानंतर आलेला पहिला चित्रपट ज्यात त्याने मुख्य भूमिका केली होती, बनथ्ये आयका, जो तमशावर आधारित होता. त्या चित्रपटामुळे तिला ओळख मिळाली आणि ती मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वांत समृद्ध आणि यशस्वी नायिका बनली. आपल्या कारकिर्दीत जयश्रीने २५०हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. त्यात तमाशा, प्रेम आणि गरीब–श्रीमंत कथांचे वैशिष्ट्य होते.

जयश्री गडकर यांचे पती बाळ धुरी आणि चिरंजीव अविनाश आणि विश्वजीत धुरी यांनी जयश्री गडकरांच्या जीवनप्रवासावर वरील नावाचा एक कार्यक्रम बनवला आहे. त्यात मधुरा दातार आणि प्रशांत नासेरी काम करीत असून तुषार दळवी आणि दीप्ती भागवत यांचे सूत्रसंचालन आहे. या कार्यक्रमाचा शुभारंभ १७ जानेवारी २०१७ रोजी झाला.


जयश्रीबाईंना अनेक मानसन्मानांनी गौरवण्यात आले. मानिनी, वैजयंता, सवाल माझा ऐका, साधी माणसं, पवनाकाठचा धोंडी या चित्रपटांसाठी त्यांना उत्कृष्ट अभिनेत्री या राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले. साधी माणसं, पाटलाची सून, थांब लक्ष्मी कुंकू लावते आणि घरगंगेच्या काठी या चित्रपटांसाठी त्यांना उत्कृष्ट अभिनेत्रीचे राज्य पुरस्कार प्राप्त झाले. घरकुलसाठी विशेष अभिनेत्री राज्य पुरस्कार त्यांना देण्यात आला. त्यांच्या चित्रपटसृष्टीतील यशस्वी कारकीर्दीकरता त्यांना व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार, ग. दि. माडगूळकर आणि जनकवी पी.सावळाराम पुरस्कार यांनी गौरवण्यात आले. त्यांचे अशी मी जयश्री हे आत्मचरित्र १९८६ साली प्रसिद्ध झाले. यामध्ये त्यांनी आपल्या चित्रपटातील कारकीर्दीचा वेध घेतला आहे. त्यांचे २९ ऑगस्ट २००८ रोजी मुंबईत हृदयविकाराने निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### सकाळची डोकेदुखी दूर होण्यासाठी या गोष्टी करा...



सकाळी उठल्यावर डोके दुखणे ही अनेकांना सतावणारी सामान्य समस्या आहे. ती केवळ थकव्यामुळेच होते असे नाही तर त्यामागे अनेक कारणे असतात. रात्री नीट झोप न लागणे, वारंवार जाग येणे किंवा झोपेत श्वास रोखला जाणे म्हणजेच स्लीप पनिया ही डोकेदुखीची मोठी कारणे ठरतात. मात्र फक्त काही गंभीर कारणे असतील असे नाही. काही वेळा सामान्य कारणेही असतात.

काही जणांना उशीची उंची चुकीची असल्यामुळे मानेला ताण येतो आणि त्याचा परिणाम डोक्यावर होतो. डोकं जड होतं आणि दुखतं.

रात्री झोपण्यापूर्वी जास्त प्रमाणात मद्यपान किंवा कॅफीन घेतल्यानेही सकाळी डोकेदुखी जाणवते. शरीरातील पाण्याची कमतरता म्हणजे डिहायड्रेशन होते. त्यामुळे डोकं दुखत. पाणी भरपूर पिणे गरजेचे आहे.

रात्री उशिरापर्यंत मोबाइल किंवा कॉम्प्युटरचा वापर करून डोळ्यांवर ताण देणे ही कारणे देखील सकाळच्या डोकेदुखीशी संबंधित आहेत.

दात खाण्याची सवय अनेकांना असते. झोपेत जबड्यावर जोर देऊन दात चावणे त्याचा आवाज करणे यामुळे डोकं दुखतं. ही कृती पोटात जंत असल्यामुळे होते. त्यामुळे जंतांचे औषध उपयुक्त ठरते.

काही पोषक घटकांची कमतरता शरीरात असेल तर असं डोकं दुखतं. जसे की जीवनसत्त्व 'बी', 'सी', 'बी १२' यांची कमतरता असेल किंवा लोहाची कमतरता असेल. त्यामुळे सकाळी उठल्यावर डोकं दुखतं किंवा चक्कर येते.

यावर सोपे उपाय करायचे झाले तर सर्वात आधी पुरेशी व शांत झोप घेणे आवश्यक आहे. रात्री झोपण्यापूर्वी कॅफिन किंवा मद्य टाळावे आणि झोपण्याची वेळ ठरवा योग्य वेळीच झोपा. उशी मऊसर आणि मानेला योग्य आधार देणारी असावी. झोपण्याआधी एक ग्लास कोमट पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेट राहते आणि सकाळी डोकेदुखी टाळता येते. खोलीत पुरेशी हवा खेळती ठेवणे आणि झोपण्याआधी स्क्रीनचा वापर कमी करणेदेखील उपयोगी ठरते. मात्र जर रोज सकाळी हा त्रास होतो, तर ते गंभीर समस्येचे लक्षण असू शकते. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

### पशुवैद्यकीय विभाग

**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

## जाहीर सुचना

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात प्राण्यांच्या अंतविधीकरिता स्मशानभूमीची सोय करणेबाबत आवश्यक बाबींकरिता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे. **इच्छुकांनी सदरचे निविदा दर दि. ११/०९/२०२५ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे समक्ष सादर करावीत. सदर दिनांका नंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत. सदर बाबतचा तांत्रिक तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| Sr.No | Particular | | Qty | Rate |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply Installation and Commissioning of Dog (Pet) Incinerator, burning rate 40-50 kgs/hr. With primary and secondary chamber furnace trolley. Refractory Brick Alkali resistance alumina fire brick with furnace back up insulation like cold face insulation brick, Hot face Kynite brick, Refractory Castable, Mortar and ceramic fiber blanket, brief details as per enclosed specification. | | | |
| ` | Type | Gas Fired LPG | | |
| | Furnace burning rating | 40-50 Kgs per hour | | |
| | Furnace Capacity | 50-100 kgs | | |
| | Overall dimension of furnace. | 2.2M (L) x 1.5M (W) x 2.2 M (H) Appx. | 1 No. | |
| | Cremation chamber size. | 1.6 M (L) x0.9M (W) x 0.9 M (H) Appx. | | |
| | Furnace structural | ISMC-75 M.S. Channel framework covered with 3-6 mm thick CRCA M.S. sheets. | | |
| | Furnace charging door. | M.S. fabricated internally insulated with ceramic wool and provided with an electrically and mechanically operating system. | | |
| | Power system | 3-phase/415 volts/50 Hz/s with neutral. | | |
| | Operating load. | 10KW normal | | |
| | Operating temperature. | 800°C.to 900°C. 950 Deg. Maximum permissible. | | |
| 1. | Refractory bricks. | Conforming to IS-8 and Superior | | |
| | Insulation bricks. | Conforming to IS-2042 and Superior | | |
| | Combustion air blower. | Appx. 225 CFM centrifugal type provided with airflow control damper. | | |
| | Exhaust air blower. | Appx. 600 CFM centrifugal type made out of 304 SS materials. | | |
| | Burner | Supply and Installing Gas Fired reputed make Required. Burner fixing of Suitable Location for Cremator for Complete Cremation process. The 2 Nos burner Size and Specifications is Standard Size and spares should be easily available in the market. | | |
| | Control panel. | This shall be made out of 14 SWG sheet metal works and painted with anti-corrosive paints. The control panel is very simple in operation and maintenance. If incorporates all switchgear required for furnace equipment, etc. It also includes Ammeter, Voltmeter, and Energy meter temp. Controller, Burner sequence controller, Connectors & terminals etc. All internal wiring is done with copper conductors suitable for 1.1 KV. Power connection to the control panel. | | |
| 2. | Scrubber Unit- Ventury Type Wet scrubber unit with 1.5 HP water pump & SS304 Spray Nozzles **Water scrubber-**This shall be provided to control air pollution emissions within 150mg/M³ as specified by Maharashtra Pollution Control Board. The water scrubber shall be fabricated out of 3mm thick AISI 304 SS plate & provided with specially designed spray nozzles, mist eliminator, dampers etc. This is coupled with AISI 304 SS 2HP suction blower( with VFD Drive) for efficient scrubbing of flue gases. The inlet water connection & drain connection, and scrubber to chimney connection with SS304 Pipe, support etc. complete.. | | | |
| 3. | CHIMNEY- Big animal Incinerator Chimney will be Used | | | |
| 4. | Supply, Installation, Testing & Commissioning of Gas Manifold unit alongwith Gas Train , Gas Hose Pipe , Regulator, MS Seamless pipe line upto burner. | | | |
| 5. | Annual maintenance of Incinerator | | | |
| 6. | Annual maintenance charges from 2nd Year will be 10% increase of Basic value Every Year. | | | |

## Animal Crematorium For Big Animal

| Sr.No | Description of Item | | Unit | Rate |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply Installation & commissioning of gas-fired Incinerator for big dead animal Capacity 500 Kgs Approx. Burning Rate 100-125 Kgs/Hr. With primary & secondary chamber furnace trolley and overhead crane 2 Ton Capacity | | set | |
| | Type | PNG/LPG fired | | |
| | Furnace Capacity/ Burning rating | Capacity 500 Kgs. 100-125Kgs/Hr. Burning Rate | | |
| | Overall dimension of furnace. | 3.75M (L) x 3 M (W) x 4 M (H) Appx | | |
| | Cremation chamber size. | 3 M (L) x 2 (W) x 1.50 M (H) Appx.. | | |
| | Furnace structural | ISMC-100 M.S. Channel framework covered with 5-6 mm thick MS sheets. | | |
| | Heating Chamber | Dually Insulated with Alkali Resistant High Density Refractory Bricks/Blocks | | |
| | Furnace charging door. | M.S. fabricated internally insulated with ceramic wool & provided with electrically & mechanically operating system. | | |

## Animal Crematorium For Big Animal

| Sr.No | Description of Item | | Unit | Rate |
|---|---|---|---|---|
| | Type | PNG/LPG fired | | |
| | Power system | 3-phase/430 volts/ 50Hzs with neutral. | | |
| | Operating load. | 30 Kw capacity | | |
| | Operating temperature. | 850°C To 900°C 1050°C Maximum permissible. | | |
| | Refractory bricks & suction duct Insulation | Alkali Resistant High Density Refractory & Superior | | |
| | High Temperature & High Alumina Insulation bricks. | Conforming to IS-2042A & superior | | |
| | Combustion air blower. | Combustion Air Centrifugal Blower. Pressure-36" Wg.Capacity-1500cfm, Top Vertical Discharge, Drive- Direct Driven, 15hp, 3 Phase | | |
| | Exhaust air blower. | Centrifugal Blower Capacity- 2100cfm 10"Wc Pressure Moc.:-SS 304, Motor 10 hp/1440rpm Drive Belt Driven Casing-SS 304 3mm Thk. Impeller & Hub SS 304 3 mm Shaft SS 304,Bearing SKF Make Pillow Block. Pulley Fenner Make Inspection Door & Drin Plug S-S304 With Impeller Dynamic Balancing & Painting Assembly, DOD :30° From Bottom Side | | |
| | Combustion System | Supply & Installation of Gas fired Wesman/ Continental Make gas Burner Rating 1000 KW Qty3 Nos With suitable damper, Gas line, Solenoid valve, Spark plug sensor etc. for Combustion Chamber & Wesman/Continental Make gas Burner Rating 800KW Qty 1 Nos With suitable damper, Gas line, Solenoid valve. Spark plug sensor etc. for Secondary Chamber. | | |
| | Secondary Chamber | The primary purpose of the secondary chamber is to ensure the complete combustion of gases and particulates that were not fully oxidized in the primary chamber. The secondary chamber operates at a higher temperature than the primary chamber, typically around 850-1000°C. By promoting complete combustion, the secondary chamber helps in reducing the emission of harmful pollutants such as carbon monoxide (CO), volatile organic compounds (VOCs), and dioxins. This leads to cleaner exhaust gases being released into the atmosphere. | | |
| | Cabling &Earthing. | From furnace control panel to all furnace equipment, heaters are provided with armored PVC insulated copper conductor cable along with earthing, earth pits in proper manner, | | |
| | Control panel. | This shall be made out of 14 SWG sheet metal works & painted with anti-corrosive paints. The control panel is very simple in operation & maintenance. If incorporates all switchgears required for furnace equipment, Burners, etc. It also includes PID temperature controller with Burner Sequence controller, Ammeter. Voltmeter, Energy meter temp. Controller, terminals etc. All internal wiring is done with copper conductors suitable for 1.1 KV. Power connection to the control panel. All Switchgears Siemens/ L&T/Schneider make only | | |
| 2 | Water scrubber | Ventury Type Wet scrubber unit with 1.5 HP water pump & SS304 Spray Nozzles Water scrubber-This shall be provided to control air pollution emissions within 150mg/M³ as specified by Maharashtra Pollution Control Board. The water scrubber shall be fabricated out of 3mm thick AISI 304 SS plate & provided with specially designed spray nozzles, mist eliminator, dampers etc. This is coupled with AISI 304 SS 7.5 HP suction blower ( with VFD Drive) for efficient scrubbing of flue gases. The inlet water connection & drain. connection, and scrubber to chimney connection with SS304 Pipe, support etc. complete. | | |
| 3 | M.S. Chimney | Chimney offered is self-supporting made out of suitable M.S. plates provided with ladder, platform for air pollution monitoring purpose. The chimney size shall be 600mm dia at top, 1200mm dia at bottom with height up to 30.5M with necessary EN-8 foundation bolts. The chimney tope shall be provided with, copper lighting arrestor with G.I. earthing strip, Aviation lamp & earth pit. The chimney shall be internally painted with heat resistant aluminum base paint & externally with black epoxy paint. chimney shall be conforming IS.( Chimney Height As per CPCB/UKPCB Norms.) | | |
| 4 | RCC Foundation | Foundation for self-supported chimney as per given Specification RCC Foundation- Foundation 2600 x 2600x 2000mm, M-25 Grade RMC Concrete, TMT bar 10 to 16 mm dia.With soil testing report. | Nos | |
| 5 | Supply, Installation, Testing & Commissioning of Gas Manifold unit along with Gas Train , Gas Hose Pipe , Regulator, MS Seamless pipe line upto burner. | | | |
| 6 | Annual maintenance of Incinerator | | 1 Year | |

**या कामी अटी व शर्ती खालील प्रमाणे:-**

१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
२. पॅनकार्ड ( संस्थेचे नावाने अथवा मालकाचे नावाचे )
३. नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे वाहतुक खर्चासह समाविष्ठ असावेत.
४. सदरची जाहीर सूचना फक्त दर खात्री करणे करीता मागविणेत येत आहे.
५. या कामी काही माहीती हवी असलेस पशुवैद्यकीय विभागाकडे संपर्क साधावा.
६. या कामी दरांची खात्री झालेनंतर जाहीर ई-निविदा मागविणेत येईल.
७. प्राप्त जाहीर निविदा सूचना दर स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निविदा समितीला असतील.

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र.४२०/४२६/२०२५

**दिनांक :- २८/०८/२०२५**

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# लग्नाचे आमिष दाखवून महिलेची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील ३० वर्षीय महिलेला घणसोलीमध्ये राहणाऱ्या व्यक्तीने लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे तसेच तिच्याकडून तब्बल ६० लाख रुपये उकळून तिची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ध्रुव नंदलाल परमार उर्फ पटेल (वय ३४) असे या आरोपीचे नाव असून त्याने पीडित महिलेचे अश्लिल व्हिडिओ काढून ते व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला मारहाणदेखील केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. खारघर पोलिसांनी या आरोपी विरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरू केला आहे.



या प्रकरणातील पीडित महिला खारघर येथे राहण्यास असून ती हॉटेलमध्ये कामाला आहे. आरोपी ध्रुव परमार सदर हॉटेलमध्ये नियमित जात असल्याने वर्षभरापूर्वी त्याची पीडित महिलेसोबत ओळख झाली होती. या ओळखीतून आरोपी परमार याने पीडित महिलेसोबत प्रेमसंबंध निर्माण केले. त्यानंतर त्याने पीडित महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केले. त्यामुळे पीडित महिला गर्भवती राहिल्याने आरोपी परमार याने जबरदस्तीने तिचा गर्भपात करवून घेतला. याशिवाय त्याने तिच्याकडून थोडे-थोडे करत तब्बल ६० लाख रुपये घेतले.

पीडित महिलेने सदर रक्कम परत मागितली असता, परमार याने तिला तिची रक्कम परत न करता तिची फसवणूक केली. तसेच त्याने तिच्या नकळत तिचे अश्लिल व्हिडिओ काढून ते व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यासोबतच तिला मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे पीडित महिलेने खारघर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार खारघर पोलिसांनी आरोपी ध्रुव परमार उर्फ पटेल याच्या विरुध्द बलात्कार, फसवणूक, मारहाण आणि धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.



**पनवेल : भाजप युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्या पुढाकाराने गणेश उत्सवाच्या निमित्ताने आरती संग्रह तयार करण्यात आला. त्याचे प्रकाशन तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.**



**पनवेल : साई राज इंटरप्राईजेसच्या वतीने कोळीवाडा येथे बांधण्यात आलेल्या गणेश विसर्जन ट्रॉलीचा शुभारंभ महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी पनवेल कोळी समाजाचे पंच कमिटी व समाज उपस्थित होता.**

## कोमसापच्या सल्लागारपदी उत्तम तरकसेंची नियुक्ती

**नवी मुंबई : बातमीदार**

पनवेल कोकण मराठी साहित्य परिषदेच्या नवीन कार्यकारणीची निवड करण्यात आली. नवीन कार्यकारणीमध्ये अध्यक्ष म्हणून सुभाष कुडके, उपाध्यक्ष नागनाथ डोलारे, सचिवपदी विजय गायकर, खजिनदारपदी काशिनाथ जाधव, जिल्हा प्रतिनिधीपदी विशाल पवार, सदस्य पदी तारे, शिवाजी मोठे, हिरवे यांची निवड करण्यात आली.

सल्लागार म्हणून नवी मुंबई पोलीस दलातील अधिकारी तसेच कवी तसेच उत्तमराव तरकसे, ॲड.सुनिता जोशी, रोहिदास पोटे, ए.के. शेख यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करत नवनिर्मित कार्यकरणी स्थापन करण्यात आली. नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा देण्यात आल्या.









**पनवेल : लाडक्या बाप्पाचे मोठ्या जल्लोषात बुधवारी आगमन झाले. या निमित्ताने तालुक्यातील शेलघर, बोर्ले, आकुर्ली, नवीन पनवेल या ठिकाणी विराजमान झालेल्या गणरायाचे भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, बोर्ले गावचे तुळशीराम पाटील, यतीन पाटील, अमृत भगत, श्रीधरशेठ भगत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**











**पनवेल : भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या शेलघर येथील निवासस्थानीही गणरायाचे आगमन झाले. अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बाप्पांची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. या वेळी योगिता भगत,  भगत, श्रीधरशेठ भगत, पांडुरंग भगत, जीवन भगत, विलास भगत, प्रमोद भगत, सुरज भगत, सचिन भगत, निलेश भगत, आदी भगत, सुहास भगत, सुधीर भगत, भूषण भगत, अंचित भगत, श्रेयांश भगत आदी उपस्थित होते.**



**डॉ. दीपक देशमुख, माणगाव**



**भूपेंद्र पाटील, आकुर्ली**



**सरपंच मंगेश शेलार, करंजाडे**



**पत्रकार राकेश खराडे, मोहोपाडा**



**सामाजिक कार्यकर्ते सतिश शर्मा, नवी मुंबई**



**उरणचे निवडणूक नायब तहसीलदार प्रभाकर पद्माकर नवाळे, विंधणे, उरण**



हरीभाऊ देशमुख, पनवेल



उरण : उद्योजक पी.पी.खारपाटील, राजेंद्र खारपाटील यांच्या चिरनेर येथील निवासस्थानी विराजमान श्रीगणेश.



मनोज वास्कर, कुंडेवहाळ, पनवेल



पत्रकार जीवन केणी, चिरनेर, उरण



मिताली विशाल वाघिलकर, टपाल नाका, पनवेल

# इंदापूर येथे भाजपतर्फे थकलेल्या प्रवाशांना नाश्ता आणि पाणीवाटप

**माणगाव : बातमीदार**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने कोकणात प्रवास करणाऱ्या असंख्य भक्तांचा ओघ मुंबई–गोवा महामार्गावरून सुरू आहे. या पार्श्वभूमीवर इंदापूर येथील सुविधा केंद्रासमोर मुंबईकडून कोकणाच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना थोडा विराम देत, भक्तांची आणि पोलीस कर्मचाऱ्यांची सेवा करण्याचा उपक्रम माणगाव तालुका भाजपचे माजी तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांनी हाती घेतला. गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला मुंबई व ठाणे सुरत कडून आलेल्या वहानातील गणेश भक्त इंदापूर येथे उभारण्यात आलेल्या सुविधा केंद्रा समोर मुंबई गोवा महामार्गावर रस्त्याकडेला थांबवून प्रवाशांना सुमारे २००० बिसलरी पाण्याची बाटली व पुरी भाजीचा नाश्ता देऊन गौरी गणपतीच्या शुभेच्छा दिल्या. त्यामुळे या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



यावेळी भाजप नेते चिन्मय मोने, दक्षिण रायगड जिल्हा चिटणीस माणगाव तालुका गोविंद कासार, बाबुराव चव्हाण, अनिल दांडेकर, निखिल साळुंखे, आत्माराम डवळे, सुरेंद्र साळी, आण्णा कुरले, सोहम शिर्के, राहुल धुपकर, यांच्यासह अनेक भाजप कार्यकर्ते व पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तांच्या यात्रेतील थकवा दूर करण्यासाठी सुमारे दोन हजार गणेश भक्तांना पुरी–भाजीचा नाश्ता आणि बिसलरीच्या पाण्याच्या बाटल्या देण्यात आल्या. त्याचबरोबर दिवसरात्र वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी पार पाडणाऱ्या इंदापूर येथील सुविधा केंद्रात तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचेही आदरपूर्वक स्वागत करून त्यांना उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. या सदिच्छा उपक्रमामुळे भक्त आणि पोलीस दोघांच्याही चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले.

हा उपक्रम भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर व खासदार तसेच भाजपा रायगड जिल्हाध्यक्ष धर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. समाजाशी निगडीत कार्यातून आनंदोत्सव अधिक अर्थपूर्ण करण्याची परंपरा भाजपने कायम ठेवली असून, यंदाच्या गणेशोत्सवात संजयआप्पा ढवळे यांनी घेतलेल्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सण नसून तो समाजातील ऐक्य, परस्पर सहाय्यभावना आणि आदरातिथ्याची संस्कृती जोपासणारा पर्व मानला जातो. भक्तांना दिलासा देणारा हा उपक्रम त्या परंपरेचे जिवंत उदाहरण ठरला आहे.

## माणगावात वाहतूक कोंडी नाही; गणेशभक्तांना आश्चर्याचा धक्का!



**माणगाव : बातमीदार**

वर्षाच्या १२ महिने महिन्याच्या तीसही दिवस मुंबई – गोवा मार्गावरील माणगावची वाहतूक कोंडी सर्वश्रुत असून गणेशोत्सव काळात तर ही डोकेदुखी शंभरपट नाही तर हजारपट म्हटले तर अतिशोक्ती ठरणार नाही. अशा प्रकारें गणेशोत्सव काळात, वाहतूक पोलिस खात्याला धडकी भरवणारी माणगाव मधील वाहतूक कोंडीची समस्या, यावर्षी पोलिस प्रशासनाच्या नियोजनबद्ध मार्गदर्शनाखाली सेवा फाउंडेशन माणगाव या संस्थेच्या कार्यकर्त्यांकडून यशस्वीरित्या पार पाडली. त्यामुळे वाहतुकीचा धसका घेतलेल्या कोकणवासीय गणेश भक्तांनी आभार व्यक्त करत त्यांना खूप धन्यवाद देताना दिसत होते.

मुंबई – गोवा महामार्ग, दिघी – पुणे महामार्ग यासोबत काही राज्य मार्ग आणि स्थानिक दळणवळणाचे मार्ग यांचा एकत्र संगम होतो ते रायगड जिल्ह्यातील माणगाव शहर हे गेली अनेक वर्ष वाहतूक कोंडीचे आगार बनले असून वर्षाच्या १२ महिने महिन्याच्या ३० दिवस ही डोकेदुखी प्रशासनासह वाहतूक पोलीस खात्याला अधिक डोकेदुखी आहे. यामध्ये कोकणवासीयांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार म्हणजे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होईल या आश्वासना शिवाय गेली अनेक पावसाळे पाहणाऱ्या मुंबई गोवा महामार्गाची अवस्था म्हणजे हा महामार्ग कोणाच्या अख्तरीत येतो की नाही, याचा वाली कोणी आहे की नाही असे वाटल्याशिवाय राहणार नाही अशी भयानक अवस्था गेली अनेक वर्ष कोंकणवासिय भोगत आहेत.असून कोणत्याही सत्ताधाऱ्यांना किंवा स्थानिक लोकप्रतिनिधीना याबद्दल कोणतेही सोयर– सुतक असल्याचे दिसून येत नाही.

या महामार्गावरून प्रवास करणारे प्रवाशी माणगाव मधील वाहतूक कोंडीचा धसका घेत असून गणेश उत्सव काळात अनेक पटीने वाढणाऱ्या वाहतुकीतून कसा मार्ग निघेल या विवंचनेत असणाऱ्या गणेश भक्तांना यावर्षी मात्र आश्चर्याचा धक्काच बसला असून न अडकता न ताटकलता सहजपणे मार्गस्थ होत आले. त्याबद्दल पोलीस प्रशासनाच्या नियोजनबद्ध, अप्रतिम, मार्गदर्शनाखाली सेवा फाउंडेशन संस्थेच्या तरुण कार्यकर्त्यांनी अफाट परिश्रमाचे सर्वत्र कौतुक होताना दिसत असून माणगावातून समाधानकारक प्रवास करून मार्गस्थ होणाऱ्या कोकणातील लाखो गणेश भक्तांनी पोलीस प्रशासनासह वाहतूककामी सहकार्य करणाऱ्या जिल्ह्यात सेवा फाउंडेशन संस्थेच्या सर्व तरुण कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त करून धन्यवाद देताना दिसून आले.

## परतीच्या प्रवासाला महाड आगार सज्ज

**महाड : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी मोठ्या प्रमाणात शहरवासीय कोकणात दाखल झाले असून ज्या पद्धतीने गणेश भक्तांना कोकणात आणण्यासाठी एस.टी. महामंडळाच्या महाड आगाराने सुविधा निर्माण करून दिली होती त्याचप्रमाणे परतीच्या प्रवासाला देखील महाड आगार सज्ज झाले आहे. महाड पासून पनवेल पर्यंत महाड आगाराकडून जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत अशी माहिती महाड आगार प्रमुख रितेश फुलपगारे यांनी दिली.



गणेश उत्सवाला आजपासून मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. शहरवासीय एसटीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गावी आले आहेत मात्र दीड दिवसीय आणि पाच दिवसांच्या गणेशाचे विसर्जन केल्यानंतर परतीच्या प्रवासाला मोठ्या प्रमाणात गर्दी होते. अनेकांना हा प्रवास मोठा त्रासदायक होतो. एसटी बरोबरच खाजगी वाहने देखील मिळत नसल्याने दिवसभर वाहनाची वाट पहावी लागते. मात्र गेली काही वर्षांपासून एसटी महामंडळाकडून चांगल्या प्रकारे नियोजन केले जात आहे. राज्यभरातील एस.टी. च्या गाड्या कोकणात अधिक प्रमाणात मागवल्या जातात. महाड आगाराने देखील अशाच पद्धतीने नियोजन केले असून गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासाला एसटी सज्ज झाली आहे.

महाड मधून मुंबई, नालासोपारा, परळ, ठाणे, बोरिवली, उरण, कल्याण, पुणे अशा विविध ठिकाणी जादा एसटी बसेसची सुविधा निर्माण केली आहे. महाड आगाराकडून जवळपास १०० बसेस या मार्गावरून धावणार आहेत. महाड पासून पनवेल पर्यंत जाण्याकरता महाड एसटी आगाराने जवळपास ५० ते ६० बसेस तयार ठेवल्या आहेत. महाड आगारातच प्रवासी वाहतूक केंद्र उभे करून याच ठिकाणी बुकिंग करत महाड पनवेल करता बसेस धावणार आहेत.

महाड पनवेल बसेस मुळे मुंबई सह अन्य ठिकाणी जाणाऱ्या गणेश भक्तांचा प्रवास सुखकर होणार आहे. गावी आलेल्या गणेश भक्तांना ग्रुप बुकिंग देखील करता येणार आहे. ग्रुप बुकिंग मुळे एसटी बस थेट त्यांच्या गावातून सुटणार आहे. यामुळे या सुविधेचा देखील लाभ घेणे फायदेशीर ठरणार आहे. महाड आगारामध्ये नुकतेच नवीन शौचालय स्वच्छतागृह देखील सुरू करण्यात आले अयरल्याचे महाड आगार प्रमुख रितेश फुलपगारे यांनी सांगितले.

## आमदार थोरवे यांनी घेतले साबळेंच्या गणरायाचे दर्शन

**खोपोली : प्रतिनिधी**

विक्रम साबळे फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम साबले यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या श्री गणेशाचे दर्शन कर्जत खालापूरचे आमदार महेंद्रशेठ थोरवे यांनी घेतले. पर्यावरण पूरक देखाव्याचे आमदार थोरवे यांनी कौतुक केले. ज्येष्ठ उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते यशवंतशेठ साबळे यांनी आमदार थोरवे यांचे स्वागत केले.



विक्रम साबळे फाउंडेशन तर्फे अलीकडेच मोठ्या प्रमाणात सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल आमदार थोरवे यांनी विक्रम साबळे यांचे कौतुक केले. गणपती उत्सवानिमित्त पर्यावरण पूरक देखावा सादर करणाऱ्या घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पारितोषिकही घोषित केले आहे. पर्यावरणाचे रक्षण व्हावे याबाबत जनजागृती करण्याचा इरादा विक्रम साबळे यांनी स्पष्ट केला. प्रत्येक नागरिकांनी पर्यावरण वाचवण्यासाठी प्रयत्न करणे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

## पालीत गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम



**पाली : प्रतिनिधी**

पाली सुधागडसह रायगड व कोकणात गणेशोत्सवाचा आगळा वेगळा उत्साह व जल्लोष सुरू आहे. घरोघरी गणरायाचं आगमन झालंय. सालाबादप्रमाणे यंदाही भाजप नेते प्रकाशभाऊ देसाई यांच्या पालीतील निवासस्थानी बाप्पा गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

जगातील सर्वात मोठा सण व उत्सव म्हणून या सणाकडे पाहिले जात आहे. पुन्हा एकदा नवी ऊर्जा व नवी उमेद घेऊन गणराया चरणी लिन होऊन सारेच नव्या जोमाने कामाला लागतात. असे सांगुन देसाई यांनी यावेळी जगभरातील जनतेला, गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या

गणेशोत्सव निमित्त देसाई यांच्या निवासस्थानी विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांची पर्वणी पहावयास मिळते, सुमधुर भजने, आरती, कीर्तन आदींनी वातावरण प्रफुल्लित होत आहे. इथल्या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवर, राजकीय नेते मंडळी, नागरिक, गणेशभक्त आवर्जून हजेरी लावत आहेत.

## गणेश दर्शन



माणगाव : गांगवली येथील संतोष व रामदास दाखिणकर यांच्या घरातील बाप्पा.



माणगाव : प्रतिष्ठित व्यापारी मंगेश मेथा यांच्या निस्वस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय.



माणगाव : माजी नगरसेवक अजित तारलेकर यांच्या बामणोली रोड निवासस्थानी विराजमान गणराय.



माणगाव : ॲड. केदार जयंत गांधी यांच्या निवास्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय.



माणगाव : प्रसिद्ध असणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ साईनगर यांनी साईनगरचा राजाचे जल्लोषात प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. या मंडळाने यावर्षी विशेष आकर्षण म्हणून श्री स्वामी समर्थ प्रकट सोहळा व आकर्षक चलचित्र देखावा सादर केला आहे. त्यामुळे हा देखावा पाहण्यासाठी गणेशभक्तांची अलोट गर्दी होत आहे.

## बाप्पाच्या आगमनाने भक्तगण सुखावले

**नागोठणे :** श्री गणेश चतुर्थी निमित्त नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत सार्वजनिक ११ व खाजगी २०१५ गणपती बाप्पाचे ढोल ताशाचा गजरात आगमन झाले. गणपती बाप्पाच्या आगमनाने नागोठण्यातीलच नव्हे संपूर्ण महाराष्ट्रातील भक्तगण सुखावले आहेत.गणपती बाप्पा विराजमान होण्यासाठी रात्रभर जागून घरोघरी अतिशय आकर्षक देखाव्यांनी सजावट करण्यात आलेली आहे.

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

**ई - निविदा सुचना**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सिडको प्राधिकरणामार्फत हस्तांतरीत नवीन पनवेल (पू. व प.) नोडमधील आरक्षित दैनिक बाजारातील दुकाने /स्टॉलधारक यांच्याकडून दैनिक बैठक शुल्क वसुल करणेकामी संस्थेची निवड करणेकरीता जाहिर ई–निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेल यांचेकडून मागविणेत येत आहेत. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. संबंधित निविदा धारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/ प्र.क्र.४१९/४२६/२०२५
दिनांक :– २८/०८/२०२५

सही/–
अतिरिक्त आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका






पनवेल : गणेश चतुर्थीच्या सणानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंजारराव, पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, भाजप पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या बाप्पाचे दर्शन घेतले.






पनवेल : दरवर्षीप्रमाणे यंदाही माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या तालुक्यातील शिवाजीनगर येथील निवासस्थानी लाडका बाप्पा विराजमान झाला आहे. शाम घरत आणि चंद्रभागा घरत यांच्या हस्ते बाप्पाची पूजा आणि प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, भरत ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, विशालशेठ ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, भारत ठाकूर, भुषण ठाकूर, स्वप्निल ठाकूर, प्रतीक ठाकूर, अमोघ ठाकूर,आदेश ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटुंबीय उपस्थित होते.



पनवेल : भाजप नेते जे.एम. म्हात्रे कुटुंबीयांच्या रंजना बंगला, कोपर (गव्हाण) येथे लाडक्या गणरायाचे आगमन झाले आहे. भाविकांनी सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून श्री गणरायाचे दर्शन घेऊन आशीर्वाद घ्यावा, असे निमंत्रण माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्याकडून करण्यात आले आहे.



सिडकोच्या असिस्टंट पीआरओ गंधाली भोकरे यांच्या घरचा बाप्पा.





भाजप नेते एकनाथ देशेकर, चिंध्रण, पनवेल



कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या घरचा बाप्पा.
तालुका अध्यक्ष धनेश गावंड व पदाधिकाऱ्यांनी दर्शन घेतले.



मंगेश पिळविलकर, पनवेल



रविंद्र पाटील, कोंडले, पनवेल












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com